भाग १

# महात्मा गांधी
# राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी
# योजना- महाराष्ट्र

# परिचय








# महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना- महाराष्ट्र

## पार्श्वभूमी

- व्ही. गिरीराज, प्रधान सचिव (रोहयो)

महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियमाची १९७७ पासून महाराष्ट्रात अंमलबजावणी सुरु झाली. राज्यात महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ नुसार दोन योजना सुरु होत्या.

I) ग्रामीण भागात अकुशल व्यक्तींकरिता रोजगार हमी योजना व

II) महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ कलम ७ (२) (दहा) नुसार वैयक्तिक लाभाच्या योजना.

सदर योजनांना राज्य शासनाच्या निधीतून अर्थसहाय्य केले जात होते.

२. सन २००५ मध्ये केंद्र शासनाने संपुर्ण भारतात राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम (विद्यमान नाव- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम ) लागू केला. तसेच केंद्र शासनाने ज्या राज्यांनी पुर्वीपासून रोजगार हमी अधिनियम मंजूर केला होता, अशा राज्यांना केंद्र शासनाच्या अधिनियमातील कलम २८ अन्वये त्यांचा कायदा राबविण्याची मुभा दिली होती.

तदनुसार महाराष्ट्र शासनाने सन २००६ मध्ये पुर्वीचा कायदा ठेवण्याचा पर्याय स्विकारला आहे. मात्र विधानमंडळाने केंद्रिय कायद्यास अनुसरुन राज्यास निधी मिळण्याच्या अनुषंगाने १९७७ च्या कायद्यात आवश्यक त्या सुधारणा केल्या, त्यामुळे योजना राबविण्याच्या कार्यपध्दतीत बदल झाला आहे.

३. सद्य:स्थितीत राज्यात महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ (सन २००६ मध्ये बदल केल्याप्रमाणे) अंमलात आहे, व या योजने अंतर्गत खालील दोन योजना सुरु आहेत.

अ) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्र (MGNREGS) या योजने अंतर्गत केंद्र शासन १०० दिवसांच्या रोजगाराची हमी देते व १०० दिवसांच्या मजुरीच्या खर्चासाठी निधी पुरवते. १०० दिवसांवरील मजुरांच्या मजुरीचा खर्चाचा आर्थिक भार राज्य शासन उचलते. परंतु १०० दिवसांवरील मजुर उपस्थिती मर्यादित आहे.

ब) महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ कलम ७ (२) (दहा) नुसार वैयक्तिक लाभाच्या योजना
१) जवाहर विहिर योजना.
२) रोहयो अंतर्गत फळबाग लागवड योजना.
शेतक-यांसाठी सदर योजना अनुदान तत्वावर प्रतिपुर्ती योजना म्हणून राबविण्यात येतात.
याशिवाय राज्य शासनाचा निधी पुढील बाबींकरीता वापरला जातो:-

- जुन्या राज्य रोजगार हमी योजनेतील प्रगतीपथावरील अपूर्ण कामे दिनांक ३० जून, २०१२ पर्यन्त पुर्ण करावयाची आहेत.
- जुन्या राज्य रोजगार हमी योजने अंतर्गत भूसंपादन केलेल्या जमीनीचा मोबदला देणेबाबत.

नुकताच महाराष्ट्र शासनाने राज्य रोजगार हमी योजनेच्या नावात बदल करुन महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र असे नामकरण केले असून सध्या केंद्र शासनाची ही योजना राज्यात सर्वत्र राबविण्यात येत आहे.

----------------------

# महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी अधिनियम १९७७ सुधारणा २००६ अंतर्गत

# महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना- महाराष्ट्र : ठळक वैशिष्ट्ये

**१. पूर्वस्थिती:**

- देशात ग्रामीण मजुरांना अकुशल रोजगाराची हमी १९७७ पासून कायद्यान्वये देणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य
- भारत सरकारने ग्रामीण रोजगाराचे विविध कार्यक्रम (जवाहर रोजगार योजना, एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम, संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना इ.) निधीच्या उपलब्धतेनुसार राबविले होते मात्र या कार्यक्रमात रोजगाराची हमी नव्हती, तर फक्त रोजगारांची उपलब्धता होती.
- महाराष्ट्राचा रोहयो कायदा, त्याची यशस्वी अंमलबजावणी, माहितीच्या अधिकाराचा कायदा व सद्यस्थितीच्या अनुषंगाने अभ्यास करून केंद्रशासनाने संपूर्ण देशासाठी दिनांक ५ सप्टेंबर २००५ पासून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा २००५ अमलात आणला.
- संपूर्ण देशातील ग्रामीण कुटुंबांना वित्तीय वर्षात १०० दिवस अकुशल रोजगाराचा हक्क प्राप्त
- राष्ट्रीय कायद्याची अंमलबजावणी दिनांक २ फेब्रुवारी २००६ पासून टप्प्याटप्प्याने सुरू व दिनांक १ एप्रिल २००८ पासून देशातील सर्व जिल्ह्यांचा समावेश

**२. एकात्मक व प्रमुख कायदेशीर बाबी**

- केंद्रीय कायद्यातील कलम २८ प्रमाणे राज्याचा कायदा केंद्रीय कायद्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा व तो केंद्रीय कायद्याशी सुसंगत असावा अन्यथा संसदेने पारित केलेला कायदा राज्याला आपोआप लागू.
- महाराष्ट्र शासनाने केंद्रीय कायद्यातील कलम २८ प्रमाणे राज्य कायदा सुसंगत करणे व केंद्र व राज्य कायद्यातील ज्या बाबी मजुरांसाठी अधिक हितावह आहेत त्या तशाच पुढे चालू ठेवणे व अशाप्रकारे राज्य कायद्यात सुधारणा करण्याचा व अशा सुधारित राज्य कायद्यांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनेस महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना संबोधण्याचा निर्णय डिसेंबर २००५ मध्ये घेतला.
- राज्य कायद्यात सुधारणा करणारा अध्यादेश दिनांक ३१ ऑक्टोबर २००६ ला काढण्यात आला.
- अध्यादेशाचे कायद्यात रुपांतर दिनांक २९ डिसेंबर २००६ ला विधिमंडळाची व मा. राज्यपालांची मान्यता घेऊन केले.
- केंद्रीय कायद्याखाली ज्या दिनांकास राज्यातील ज्या जिल्ह्याचा समावेश त्या दिनांकास सुधारित राज्य कायद्यातील कलम १६ (ब) त्या जिल्ह्यास लागू व महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना त्या जिल्ह्यात सुरू. एप्रिल २००८ पासून सर्व जिल्ह्यांना लागू
- राज्याच्या कायद्यातील सुधारणांमुळे महाराष्ट्र हे देशातील इतर सर्व राज्यांप्रमाणे केंद्रीय निधी मिळविण्यास पात्र
- २६ जुलै २०११ पासून महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेचे नाव महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना- महाराष्ट्र असे संबोधण्यात येत आहे.



### ३. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना- महाराष्ट्राची वैशिष्ट्ये

- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना- महाराष्ट्रखाली नोंदणीकृत ग्रामीण घरातील प्रत्येक प्रौढ व्यक्तीस अकुशल रोजगाराचा हक्क कुटुंबनिहाय (household) जॉब कार्ड
- नोंदणीकृत कुटुंबाला वित्तीय वर्षात किमान १०० दिवस केंद्रीय निधीतून अकुशल रोजगाराची हमी आवश्यक ज्यादा दिवसांसाठी राज्यनिधीतून अकुशल रोजगाराची हमी.
- कायद्याच्या अंमलबजावणीची प्राथमिक जबाबदारी ग्रामपंचायतीची
- प्रतिदिन मजूरीचे दर केंद्रशासन निश्चित करेल
- केंद्रशासनाने ठरविलेल्या दराप्रमाणे मजूरास मजूरी मिळेल. अशा प्रकारचे दरपत्रक राज्यशासन निश्चित करेल. कामाप्रमाणे दाम, स्त्री-पुरुष समान दर
- काम केल्यावर जास्तीतजास्त १५ दिवसात मजूरी वाटप
- कामासाठी नाव नोंदणी केलेल्या मजुराने किमान १४ दिवस सलग काम करणे आवश्यक
- एका ग्रामपंचायत हद्दीत काम सुरू करण्यासाठी किमान १० मजूर आवश्यक ही अट डोंगराळ भाग व वनीकरण कामासाठी शिथिलक्षम
- मजुरीचे वाटप मजुराच्या बँक वा पोस्ट बचतखात्यात.
- गावाच्या ५ किमी परिसरात रोजगार देणे. कोणत्याही परिस्थितीत पंचायत समिती क्षेत्राबाहेर नाही.
- कामावर कंत्राटदार लावण्यास बंदी
- कामात किमान ६० टक्के भाग अकुशल तालुका व जिल्हा स्तरावर अकुशल-कुशलाचा हिशोब ठेवता येईल.
- मजुरामार्फत करता येण्यासारख्या कामावर मशीनरी लावण्यास बंदी
- राज्यशासनास सल्ला देणारी महाराष्ट्र रोजगार हमी परिषद
- सर्व माहिती कामावर, ग्रामपंचायत व वेबसाईटवर उपलब्ध करून देणार
- कामाचे सामाजिक अंकेषण (Social Audit) व पारदर्शकता
- तक्रार निवारण

### ४. मजुरांसाठी सोयीसवलती

- गावापासून ५ किमीपेक्षा जास्त अंतरावर रोजगार दिल्यास १० टक्के जास्त मजुरी राज्यशासनामार्फत
- अकुशल रोजगार उपलब्ध न केल्यास दैनिक मजुरीच्या २५ टक्के बेरोजगार भत्ता
- कामावर पिण्याचे पाणी, प्राथमिक उपचार व बरोबर आणलेल्या ६ वर्षाखालील लहान मुलांना सांभाळण्याची सोय
- कामाच्या अनुषंगाने मजुरास वा बरोबर आणलेल्या लहान मुलास दुखापत झाल्यास रुग्णास सर्व रुग्णसेवा शासकीय खर्चाने व दैनिक मजुरीच्या ५० टक्केपर्यंत रक्कम सानुग्रह रुग्ण भत्ता. अपंगत्व वा मृत्यू आल्यास रुपये ५०,००० पर्यंत सानुग्रह अनुदान
- कुटुंब नियोजनाकरिता सवलती

### ५. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना- महाराष्ट्र अंतर्गत जबाबदाऱ्या

प्रमुख जबाबदारी- पंचायत राज संस्थांची त्यात जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्राम पंचायत व ग्रामसभा

**ग्रामपंचायतीच्या जबाबदाऱ्याः**

- कुटुंबाची नोंदणी
- रोजगार उपलब्ध करणे
- ग्रामसभेच्या माध्यमातून रोजगाराच्या गरजेचा पूर्व वार्षिक अंदाज घेणे, त्याचप्रमाणे नियोजन आराखडा व कामाचे प्राधान्य ठरविणे

- सामाजिक अंकेषण (Social Audit) व पारदर्शकता
- दक्षता समिती
- रोजगार दिवस

**पंचायत समितीच्या जबाबदाऱ्या**

- समिती क्षेत्रातील सर्व ग्रामपंचायतीचे समन्वयन, सनियंत्रण व कामाचे नियोजन

**जिल्हा परिषदेच्या जबाबदाऱ्या**

- जिल्ह्यातील सर्व पंचायत समिती क्षेत्रनिहाय वार्षिक मजूर अंदाज व कामाचे नियोजन
- सनियंत्रण, समन्वयन

**६. पंचायतराज संस्थांना त्यांची कायदेशीर जबाबदारी पार पाडण्यास मदत करणारे अधिकारी**

**जिल्हा कार्यक्रम समन्वयक (जिल्हाधिकारी) योजनेचे जिल्हा प्रमुख**

- सनियंत्रण
- नियोजन
- निधीवाटप
- प्रशासकीय मान्यता
- तपासणी
- माहिती समन्वयक

**सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक (प्रमुख कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद)**

- जिल्हा कार्यक्रम समन्वयकास मदत
- नियोजन
- निधी
- प्रशासकीय मान्यता
- तपासणी

**कार्यक्रम अधिकारी (तहसीलदार)**

- प्रशासकीय मान्यता
- तहसीलमधील नियोजन
- समन्वय
- वेळेवर मजुरी वाटप
- सोशल ऑडिट
- तक्रार निवारण
- जिल्हा कार्यक्रम समन्वयकाच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यास ते सूचित करतील. त्याचप्रमाणे कार्य करणे.

**सहकार्यक्रम अधिकारी (गटविकास अधिकारी)**

- प्रशासकीय मान्यता
- पंचायत समिती क्षेत्रातील मग्रारोहयो संदर्भात सह जिल्हा कार्यक्रम समन्वयकास त्यांच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यास ते सूचित करतील त्याप्रमाणे कार्य करणे
- कार्यक्रम अधिकाऱ्यास मदत

**कार्यान्वयीन यंत्रणा व त्यांचे अधिकारी**

- जिल्हा कार्यक्रम समन्वयक, सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक, कार्यक्रम अधिकारी, सह कार्यक्रम अधिकारी यांना त्यांच्या कायदेशीर जबाबदाऱ्या पार पाडण्याकरिता मदत



**ग्रामसेवक**

- ग्रामपंचायतीच्या जबाबदाऱ्या पार पाडणे
- निधी
- अभिलेख

**ग्राम रोजगार सेवक**

- ग्रामपंचायतीला मदतनीस

**७. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना- महाराष्ट्र अंतर्गत करावयाच्या कामांचे स्वरूप कामाची प्राधान्यता व अंमलबजावणी बाबत ठळक मार्गदर्शक तत्त्वेः**

- अकुशल रोजगाराची पूर्तता, दीर्घकालीन टिकणारी कामे व त्याद्वारे सामाजिक पायाभूत सोयी उपलब्ध करून देऊन ग्रामीण जनतेचे राहणीमान उंचावेल व कायमस्वरूपी मालमत्ता तयार होईल अशा प्रकारे योजनेची अंमलबजावणी करणे
- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना- महाराष्ट्र अंतर्गत कामाचे स्वरूप व प्राधन्यता (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम, २००५ मधील शेड्यूल १ नुसार)
    १. जलसंधारण व जलसंवर्धन कामे
    २. दुष्काळ प्रतिबंधक कामे (वनीकरण व वृक्ष लागवडीसह)
    ३. जलसिंचन कालव्यांची कामे (लघु व सूक्ष्म जलसिंचन कामासहित)
    ४. अनुसूचित जातीजमाती, दारिद्र्यरेषेखालील, भूसुधार खालील व इंदिरा आवास योजनेचे लाभार्थी, कर्जबाजारी लहान व अल्पशेतकरी यांच्या जमिनीसाठी जलसिंचन निर्माण करणारी कामे, फळझाड व भूसुधार कामे
    ५. पारंपरिक पाणीसाठ्यांच्या योजनेचे नूतनीकरण करणे व तलावातील गाळ काढणे
    ६. भूविकासाची कामे
    ७. पूरनियंत्रण, पूरसंरक्षणाची कामे, पाणथळ क्षेत्रात चाऱ्याची कामे
    ८. ग्रामीण भागात बारमाही जोडरस्त्यांची कामे
    ९. राजीव गांधी भवन
    १०. केंद्रशासनाशी सल्लामसलत करून राज्यशासनाने ठरविलेली कामे

**८. वार्षिक कामांचा आराखडाः**

- ग्रामपंचायतीने ग्रामसभेच्या माध्यमातून प्रत्येक गावाच्या वार्षिक अकुशल रोजगाराच्या गरजेचा अंदाज बांधणे
- शासनाने तयार केलेल्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना- महाराष्ट्र आराखड्यातील कामांची निवड, प्राधान्यता लक्षात घेऊन ग्राम पंचायतीने करणे
- ग्रामपंचायतीने बांधलेला अपेक्षित रोजगाराचा अंदाज व कामांच्या निवडीप्रमाणे कार्यक्रम अधिकाऱ्याने पंचायत समिती क्षेत्राशी वार्षिक कामांचा आराखडा व नियोजन तयार करणे
- ऑक्टोबर व डिसेंबर या काळात पुढील वर्षात घ्यावयाच्या कामांना तांत्रिक मान्यता, जिल्हा परिषदेची मान्यता इ. विहीत कार्यपद्धतीचे पालन करणे
- जिल्हा कार्यक्रम समन्वयक, सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांनी जिल्हा परिषदेची संपूर्ण जिल्ह्याच्या आराखड्यास व नियोजनास मंजुरी प्राप्त करून घेणे व मंजूर आराखड्यातील कामांना विशिष्ट क्रमांक देणे
- वार्षिक आराखड्याचे वेळापत्रक पुढील वर्षात घ्यावयाच्या कामांची शिफारस २ ऑक्टोबरच्या ग्रामसभेत घेणे
- ग्रामसभेच्या शिफारशीप्रमाणे ग्रामपंचायत कामाचा प्राधान्यक्रम निश्चित करेल
- पंचायत समिती ग्राम पंचायतीकडून आलेले आराखडे नोव्हेंबर अखेरपर्यंत अंतिम करतील
- जिल्हा कार्यक्रम अधिकारी देखील कामांची शिफारस करेल व जिल्हा परिषदेकडे देईल.

- पंचायत समितीने व जिल्हा कार्यक्रम अधिकाऱ्याने शिफारस केल्याप्रमाणे जिल्हा परिषद दरवर्षी डिसेंबरमध्ये जिल्ह्याचा पुढील वार्षिक मजूर आराखडा मंजूर करेल.
- डिसेंबर अखेर राज्यशासनास सर्व जिल्ह्यांचे पुढील वर्षाचे मजूर आराखडे प्राप्त करणे
- राज्य शासन जानेवारी महिन्यात राज्याचा जिल्हावार मजूर वार्षिक आराखडा केंद्रशासनास सादर करेल.

## ९. MIS संकल्पना

- NIC ने www.nrega.nic.in ही वेबसाईट विकसित केली आहे.
- प्रत्येक ग्रामपंचायत, पंचायत समितीकरिता विशिष्ट क्रमांक दिलेला आहे.
- निधीवाटप कामे, खर्चाविषयीच्या, (अकुशल व साहित्य, सामग्री (कुशल)), सामाजिक अंकेषण, मजूर उपस्थिती इ.ची सर्वतोपरी माहिती ऑनलाईन संकेतस्थळावरील विहित विवरण पत्रात भरावी लागते.
- विशिष्ट संकेतांक पुढील बाबींकरिता दिलेले आहेत-
  १. जॉब कार्ड धारकांना १६ अंकी क्रमांक
  2. MGNREGA अंतर्गत घेतल्या जाणाऱ्या कामांना क्रमांक
  ३. हजेरीपटांना क्रमांक
  ४. प्रत्येक कामाला विशिष्ट क्रमांक
- ऑनलाईन पद्धतीने माहितीचे संकलन केले जाते.
- कोणत्याही प्रकारची माहिती भरताना चूक झाल्यास अशा प्रकारची माहिती सॉफ्टवेअरकडून आपसूकपणे नाकारली जाते. केंद्रशासनाकडून वितरित होणारा निधी अशा प्रकारे भरल्या जाणाऱ्या माहितीवर व त्या आधारे तयार होणाऱ्या रिपोर्टवर अवलंबून आहे.
- अलर्ट संकेतस्थळावर दाखविले जातात. देशभरातील सर्व ग्रामपंचायतीपर्यंतची कामे, मजुरांची नावे, उपस्थिती इत्यादि माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

## १०. लेबर बजेट संकल्पना

- योजनेअंतर्गत ग्रामपंचायतीमार्फत घेण्यात येणाऱ्या सर्व कामांचा वार्षिक कृती आराखडा
- कार्यक्रम अधिकारी, सह कार्यक्रम अधिकारी, जिल्हा कार्यक्रम समन्वयक, सहजिल्हा कार्यक्रम समन्वयक यांच्यावर ग्रामीण पंचायतीचे लेबर बजेट तयार करून घेण्याची जबाबदारी आहे.
- लेबर बजेट सोप्या पद्धतीने पुढीलप्रमाणेः
  ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये काम करण्यास इच्छुक असलेल्या सरासरी कुटुंबाची संख्या x सरासरी दिवस x मजुरी दर (जसे सरासरी ५० कुटुंबे x २० दिवस x रुपये १२७)
- लेबर बजेट करिता व अनपेक्षित वाढीसाठी कामाचा पुरेसा शेल्फ तयार असावा
- केंद्र शासनाकडून वितरित होणारा निधी हा लेबर बजेटवर अवलंबून आहे.

## ११. कामांची मजूरी व कार्यान्वयन-

- प्रस्तावित वा मंजूर आराखड्यातील कामांची अंदाजपत्रके यंत्रणा वा ग्रामपंचायतीकडून जिल्हा कार्यक्रम समन्वयकाने तयार करून घेणे
- अंदाजपत्रकास सक्षम तांत्रिक अधिकाऱ्याने मंजूरी देणे
- अंदाजपत्रकानुसार ज्या कामात साहित्य, कुशल, अर्धकुशल मजूरी यांचा खर्च ४० टक्क्याहून (साहित्य, साधनसामुग्री इ.) अधिक नसावा.
- अकुशल मजूरीचा भाग किमान ६० टक्के असावा.
- कार्यक्रम अधिकाऱ्याने आवश्यकतेनुसार प्रशासकीय मान्यता दिलेल्या कामांना काम सुरू करण्याचे आदेश



द्यावेत.

१. ते देताना वार्षिक आराखड्याच्या किंमतीच्या किमान ५० टक्के खर्चाची कामे ग्रामपंचायतीमार्फत कार्यान्वित करण्याची कायद्यात तरतूद.
२. नवीन काम सुरू करण्यास किमान १० मजूर आवश्यक. सदर अट डोंगराळ व वनीकरणाच्या कामास शिथिल.
३. यंत्रणेने विहीत हजेरीपट ठेवणे
४. झालेल्या कामाचे मोजमाप घेऊन दरपत्रकाप्रमाणे मजुरी हिशोबित करून हजेरीपट संपल्याच्या दिनांकापासून जास्तीतजास्त १५ दिवसांच्या आत मजूरी पोस्ट वा बँकेत मजुराच्या खात्यावर जमा करणे
५. कुशल कामे खात्यामार्फत करणे
६. कामावर कंत्राटदार न नेमणे
७. मजुरांमार्फत करता येणाऱ्या कामांकरिता यंत्राचा वापर न करणे
८. कामासंदर्भात सर्व माहिती कामावर, ग्रामपंचायतीमध्ये व वेबसाईटवर उपलब्ध करणे
९. कामाच्या अकुशल भागाबाबत आदेशानुसार मजुरीवरील खर्च एकूण खर्चाच्या ६० टक्के प्रमाणात ठेवावा. ४० टक्के कुशल खर्चामध्ये साहित्य सामुग्री, अर्धकुशल-कुशल मजुरी यांचा समावेश आहे.

## १२. कामांना तांत्रिक व प्रशासकीय मान्यता

| अ.क्र. | यंत्रणा | तांत्रिक मान्यता | प्रशासकीय मान्यता |
|---|---|---|---|
| अ. | रुपये २५ लाखापर्यंत प्रत्येक कामाची किंमत (ग्रामपंचायत/ पंचायत समिती) | पंचायत समिती स्तरावरील संबंधित तांत्रिक अधिकारी | सह कार्यक्रम अधिकारी (गटविकास अधिकारी) |
| | शासकीय | तालुका स्तरावरील शासकीय यंत्रणा तांत्रिक अधिकारी | कार्यक्रम अधिकारी (तहसीलदार) |
| ब. | रुपये २५ लाखापेक्षा जास्त प्रत्येक कामाची किंमत (ग्रामपंचायत/पंचायत समिती) | जिल्हा स्तरावरील परिषदेचे तांत्रिक अधिकारी | सहकार्यक्रम समन्वयक (मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प.) |
| | शासकीय | जिल्हा स्तरावरील तांत्रिक अधिकारी | जिल्हा कार्यक्रम समन्वयक (जिल्हाअधिकारी) |

टीप- सद्यस्थितीत बहुतांश कामाची किंमत रु. ५ ते १२ लाखापर्यंत आहे.

## १३. कामाचे गुणनियंत्रण व दक्षताः

- स्वतःहून माहिती जाहीर करणे.
- दक्षता समिती.
- दक्षता पथकाकडून तपासण्या.
- नियमित तपासण्या व पाहणी.
- विभागीय आयुक्तांमार्फत पर्यवेक्षण, समन्वय, सनियंत्रण.
- Ombudsman ची नियुक्ती

• सामाजिक अंकेक्षण
  १. पारदर्शकता
  २. कामांची व इतर माहितीसह माहिती पत्रके
  ३. सर्व कागदपत्रे व्हाउचरसह सामाजिक अंकेषणासाठी जनतेला पाहण्यासाठी उपलब्ध

**१४. कार्यान्वयीन यंत्रणा**

• ग्रामपंचायत
  वार्षिक आराखड्यातील किमान ५० टक्के खर्चाची कामे
• पंचायत समिती
• शासकीय विभाग

**१५. निधीः**

• १०० दिवसाच्या हमीपोटी १०० टक्के मजुरीचा खर्च भारत सरकार
• ७५ टक्के साहित्य व कुशलचा खर्च भारत सरकार
• २५ टक्के साहित्य व कुशलचा खर्च राज्य शासन
• ६ टक्के कामाच्या एकूण (मजुरी व कुशल) खर्चाच्या प्रशासकीय खर्च भारत सरकार
• सर्व लेखांची तपासणी सनदी लेखापालाकडून



# महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना व राज्य रोजगार हमी योजना- फरक :

| महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना | राज्य रोजगार हमी योजना |
|---|---|
| • खर्चाच्या किमान ५० टक्के कामे ग्रामपंचायतीमार्फत व त्यास ग्रामसभेची मान्यता | • लाइन डिपार्टमेंटकडून अंमलबजावणी. ग्रामपंचायतीची भूमिका |
| • कंत्राटदारावर बंदी | • कुशल कामाकरिता कंत्राटदारांना परवानगी |
| • बँक/पोस्टामार्फत मजुरी वाटप | • रोखीने मजुरीवाटप |
| • संगणक प्रणालीद्वारे ऑनलाईन रिपोर्टिंग व संनियंत्रण | • ऑनलाइन रिपोर्टिंग नाही |
| • सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता | • समाजिक अंकेक्षण नाही |
| • जॉब कार्डची आवश्यकता | • जॉबकार्ड बंधनकारक नाही |
| • १०० दिवसांच्या रोजगाराची केंद्रशासनाची हमी व त्यानंतर राज्यशासनाची हमी | • ३६५ दिवसांच्या कामाची हमी |
| • लेबर बजेट व जिल्हापरिषदेची मान्यता | |
| • भूसंपादनाकरिता स्वतंत्र निधीची तरतूद नाही | |

# राज्य रोहयो अंतर्गत वैयक्तिक लाभाच्या योजना व महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत वैयक्तिक लाभाच्या योजना- फरक :

| महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना | राज्य रोजगार हमी योजना |
|---|---|
| १. केंद्रीय कायद्याच्या परिशिष्ट १ मधील कलम 1 (IV) प्रमाणे | १. राज्य रोहयो कायद्याच्या कलम 7 (2) (x) प्रमाणे |
| २. योजना<br>अ) मग्रारोहयो विहिरी<br>ब) शेततळे (यंत्रसामुग्रीचा वापर न करता)<br>क) फळबाग लागवड<br>ड) भूसुधारणा | २. योजना<br>अ) जवाहर विहिरी<br>ब) रोहयो फळबाग लागवड<br>क) रोहयो तुती लागवड<br>ड) खाजगी पडीक जमिनीवर वृक्ष लागवड<br>इ) शेततळे |
| ३. प्रत्यक्ष कामावर येणारा खर्च शासनाकडून करण्यात येतो. | ३. अनुदान पद्धतीची प्रतिपूर्ती योजना |
| ४. जॉब कार्ड आवश्यक आहे | ४. जॉबकार्डची आवश्यकता नाही |
| ५. ग्रामसभेद्वारे लाभार्थ्यांची निवड करण्यात येते व गटविकास अधिकारी प्रशासकीय मान्यता देतात | ५. विविध स्तरावर मान्यता |
| ६. सर्वसाधारपणे ग्रामपंचायतीकडून अंमलबजावणी | ६. विविध यंत्रणांकडून अंमलबजावणी |
| ७. यंत्रसामुग्री वापरण्यास मुभा नाही | ७. प्रतिपूर्ती योजना असल्याने यंत्रसामुग्री वापरण्यास मुभा आहे. |
| ८. १५ दिवसात मजुरी प्रदान करणे बंधनकारक आहे. | ८. १५ दिवसात अनुदान देणे बंधनकारक नाही |
| ९. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्यातील तरतुदीनुसार परिच्छेद २ मधील लाभार्थ्यांची निवड करण्यात येते | ९. राज्यशासनाच्या निकषांप्रमाणे लाभार्थ्यांची निवड करण्यात येते. |
| १०. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे बंधनकारक | १०. राज्यशासनाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे बंधनकारक |



# करा सक्षम आपल्या ग्रामपंचायती, MGNREGA आहे आपल्याचसाठी

(‘महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्या’विषयी सामान्यपणे विचारल्या जाणाऱ्या शंका आणि त्यांचे समाधान)

### १. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्याचे (NREGA) उद्दिष्ट काय?

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्याने प्रत्येक वित्तीय वर्षात ग्रामीण भागातील प्रत्येक घरातील प्रौढ व्यक्तीला किमान १०० दिवस काम मिळण्याची कायदेशीर हमी मिळते. त्यांच्या मार्फत अकुशल कामे करून घेतली जातात. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा २ फेब्रुवारी २००६ रोजी अंमलात आला.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्यानुसार संबंधित राज्यासाठी निर्धारित केलेल्या दराने त्याला किंवा तिला मजुरी मिळते. मजुरीचे हे दर केंद्र सरकारच्या ग्राम विकास खात्याकडून जाहीर केले जातात.

### २. या कायद्यानुसार रोजगारासाठी कोण अर्ज करू शकते?

कोणत्याही गावातील प्रत्येक घरातील प्रौढ व्यक्ती त्या परिसरात होणारे अकुशल काम करण्यासाठी अर्ज करू शकतात. एखादी व्यक्ती आधीपासून रोजगार करत असेल तर ती देखील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्याच्या आधारे रोजगारासाठी अर्ज करू शकते. महिलांना प्राधान्य दिले जाते. या योजनेच्या अंतर्गत किमान १/३ महिलांची नोंदणी करून त्यांना काम दिले जाते.

### ३. नोंदणी प्रक्रिया कशी असते?

एखाद्या व्यक्तीला या योजनेच्या माध्यमातून रोजगार हवा असेल तर त्याने लेखी अर्ज करावा किंवा रोजगाराची तोंडी मागणी करावी. नोंदणी प्रक्रिया आणि त्यासाठीचा अर्ज मोफत दिला जातो.

### ४. नोंदणीचे अर्ज कोणाकडे सादर करावेत?

सदर अर्ज ग्रामपंचायत किंवा ब्लॉक ऑफिसमध्ये सादर करावेत.

### ५. नोंदणीप्रक्रियेत ग्रामपंचायतीची भूमिका काय असते?

नोंदणी अधिकृत करण्यासाठी ग्रामपंचायत ही अर्जदार त्याच गावचा रहिवाशी आहे का आणि तो सज्ञान आहे का, हे पाहते. नोंदणीसाठी घर एक घटक मानले जाते. त्यानंतर ग्रामपंचायतीकडून घराला जॉब कार्ड दिले जाते.

### ६. जॉब कार्ड म्हणजे काय?

जॉब कार्ड म्हणजे मूळ कायदेशीर दस्तावेज. त्याच्या आधारे नोंदणीत सदस्य रोजगाराची हमी मिळवू शकतो. अर्ज केल्यानंतर १५ दिवसात जॉब कार्ड उपलब्ध व्हायला हवे. त्याची वैधता ५ वर्षेपर्यंत असते.

जॉब कार्डवर प्रत्येक नोंदणीत सदस्याचे नाव तसेच छायाचित्र असते. हे जॉब कार्ड किंवा छायाचित्र मोफत उपलब्ध करून दिले जाते.

### ७. जॉब कार्ड मिळाले म्हणजे रोजगार मिळेलच असे आहे का?

नाही. रोजगार मिळण्यासाठी संबंधित व्यक्तीला अर्ज करणे गरजेचे आहे.

### ८. कामासाठी कशाप्रकारे अर्ज केला जातो?

ज्याला काम हवे आहे त्याने ग्रामपंचायत किंवा कार्यक्रम अधिकाऱ्याकडे (ब्लॉक आफिस) लेखी अर्ज सादर करायला हवे. एक सदस्यही अर्ज करू शकतो. ही मागणी किमान १४ दिवस सलग कामाची असू शकते.

### ९. कामासाठी अर्ज केल्यानंतर त्याची पोचपावती अर्जदाराला मिळू शकते का?

होय. ग्रामपंचायतीने तारखेसहित तशी पोचपावती

अर्जदाराला द्यायला हवी.

### १०. एखाद्या व्यक्तीला किती दिवस रोजगार मिळू शकेल?

या कायद्यानुसार एखाद्या घरातील व्यक्तींना वित्तीय वर्षात १०० दिवस रोजगार मिळू शकतो. हे १०० दिवस घरातील विविध सदस्य एकमेकांत विभागून घेऊ शकतात. घरातील एकापेक्षा अधिक सदस्य एकावेळी काम करू शकतात किंवा वेगवेगळ्या वेळीही काम करू शकतात.

### ११. रोजगाराबाबतची माहिती अर्जदाराला कशी मिळू शकेल?

ग्रामपंचायत कार्यक्रम अधिकारी यांच्याकडून अर्जदाराला कोठे आणि कधी रोजगार उपलब्ध होणार हे पत्राद्वारे कळविले जाते. त्याशिवाय ग्रामपंचायत किंवा कार्यक्रम अधिकाऱ्याच्या ब्लॉक आफिसवर जाहिर नोटीस लावली जाते. त्यावर कामाचे ठिकाण, तारीख आणि रोजगार कोणाला उपलब्ध झाला आहे त्यांची नावे असतात.

### १२. रोजगार उपलब्ध होऊ शकला नाही तर काय केले जाते?

अर्ज केल्यानंतर १५ दिवसांच्या आत अर्जदाराला रोजगार उपलब्ध झाला नाही तर दररोजचा बेरोजगारी भत्ता या कायद्यानुसार अर्जदाराला मिळू शकतो.

### १३. अर्जदाराने कामाच्या ठिकाणी १५ दिवसांच्या आत हजेरी लावली नाही तर?

अर्जदाराने कामाच्या ठिकाणी या काळात हजेरी लावली नाही तर त्याला बेरोजगारी भत्ता मिळणार नाही पण तो कामासाठी नव्याने अर्ज करू शकतो.

### १४. उपलब्ध होणारा रोजगार कोणत्या परिसरात असतो?

अर्जदाराच्या निवासस्थानापासून ५ किमीच्या परिसरातच हा रोजगार उपलब्ध करून दिला जातो. त्यापेक्षा अधिक अंतरावर जर रोजगार असेल तर अर्जदाराला १० टक्के अधिक रोजगार हा प्रवास व राहण्याच्या भत्त्यासाठी दिला जातो. अधिक वयाचे कामगार तसेच महिलांना घराजवळ रोजगार मिळावा यास प्राधान्य दिले जाते.

### १५. कामाच्या ठिकाणी कामगारांना कोणत्या सोयीसुविधा दिल्या जातात.

पिण्याचे स्वच्छ सुरक्षित पाणी, लहान मुलांसाठी निवारा, विश्रांतीसाठी काही वेळ, लहान-सहान जखमांवरील उपचारांसाठी तसेच आरोग्यविषयक अन्य समस्यांसाठी प्रथमोपचार पेटी, ६ वर्षांखालील पाच पेक्षा अधिक लहान मुले कामाच्या ठिकाणी असतील तर त्यांच्यावर देखरेख करण्यासाठी एका व्यक्तीची नियुक्ती केली जाते.

### १६. कोणत्या पद्धतीचे काम येथे दिले जाते?

दीर्घकालीन उपयोगासाठीची साधने ग्रामीण भागातील जनतेच्या जीवनासाठी उपयुक्त साधनांची निर्मिती करणे हे या योजनेचे मुख्य ध्येय आहे. कंत्राटदारांच्या मार्फत केल्या जाणाऱ्या कामांना परवानगी दिली जात नाही. यात प्राधन्यक्रमाने केली जाणारी कामे अशी आहेतः

१. जलसंवर्धन आणि सिंचन

२. दुष्काळ निवारण (वनीकरण आणि वृक्षलागवड)

३. सूक्ष्म आणि लघु सिंचन प्रकल्पांतर्गत सिंचनासाठी कालवे इ. बांधणे

४. सिंचनाची सोय उपलब्ध करणे, फलोत्पादनासाठी लागवड तसेच अनुसूचित जाती व जमातींकडील किंवा दारिद्र्यरेषेखालील लोकांच्या किंवा भूसुधार कायद्यातील लाभार्थींच्या शेतजमिनीचा विकास करणे किंवा इंदिरा आवास योजनेच्या लाभार्थींना मदत करणे. कृषी कर्ज माफी आणि कर्जसवलत योजना २००८ मध्ये नोंदवलेल्या लहान आणि गरीब शेतकऱ्यांना मदत पुरविणे

५. पाणी पुरवठा योजनेअंतर्गत पाण्याच्या टाक्यातील गाळ उपसणे.

६. भूसुधारणेची कामे

७. बारमाही रस्त्यांनी गावे जोडणे

८. पूर नियंत्रण आणि संरक्षक कामे. यात पाणी साचणाऱ्या भागात निचरा करण्यासाठी कामे करणे.

९. तालुका स्तरावर राजीव गांधी भवन व ग्रामपंचायत येथे राजीव गांधी सेवा केंद्र निर्माण करणे

१०. केंद्रसरकारशी सल्लामसलत करून राज्य सरकारने कोणतीही अन्य कामे करणे.

### १७. कामाची निवड करताना मजुरी आणि साहित्य यांचे प्रमाण काय असते?

जिल्हा स्तरावर कामाची निवड करताना मजुरी व साहित्य यांचे प्रमाण ६०-४० असते.

### १८. या कामात कंत्राटदार किंवा यंत्रसामुग्रीचा वापर होतो का?

मजूर हा केंद्रस्थानी असल्याने येथे कंत्राटदार किंवा



यंत्रसामुग्रीचा वापर होत नाही.

## १९. यातील नियोजन प्रक्रिया कशी ठरते?

या योजनेतील कामांचे नियोजन आणि ती पूर्ण करण्यामध्ये ग्रामसभा व ग्रामपंचायत यांचीच मध्यवर्ती भूमिका असते.

अ. ग्राम सभेच्या बैठकीत ग्राम पंचायतीकडून किती मजूर पुढील वित्तीय वर्षात लागू शकतात, याचा अंदाज वर्तवतात. त्यानंतर कोणती कामे प्राधन्यक्रमाने घ्यायची हे देखील ठरते. खर्चाचा विचार करता किमान ५० टक्के कामे ग्रामपंचायतीने करणे गरजेचे असते.

ब. ग्रामविकास आराखड्याशी गावातील कामांची सांगड घातल्यानंतर ग्रामपंचायत हा प्रस्ताव पुढे कार्यक्रम अधिकाऱ्याकडे मंजुरीसाठी पाठवते.

क. कार्यक्रम अधिकारी १५ दिवसात कामे मंजूर करून जवळच्या पंचायतीकडे पाठवतात. गट आराखडा आणि गट मजूर अंदाजपत्रक हे जिल्हा कार्यक्रम समन्यवयकाकडे (डीपीसी) सादर केले जाते.

ड. डीपीसी ही सर्व कामे जिल्ह्यातील वार्षिक कामांच्या आराखड्याशी पंधरवड्यात जोडतो. त्यात प्राधान्यक्रम, ग्रामपंचायत आणि ब्लॉक यांना असतो.

इ. त्यानंतर डीपीसी जिल्ह्याचा, मजुरांचा अंदाजित आकडा व अर्थसंकल्प तयार करतो. त्यानंतर हे ऑनलाईन (MIS) मध्ये साठवते. त्यानुसार मंजूर झालेल्या कामगारांचा आकडा पाहून त्यानुसार निधी उपलब्ध होतो.

## २०. मजुरी किती दिली जाते?

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्याने ठरवून दिलेल्या मानकांनुसार त्याला किंवा तिला मजुरी दिली जाते. त्यासाठी रु. १२७/- हा दर केंद्र सरकारने ठरवून दिलेला आहे.

## २१. ही मजुरी कधी दिली जाते?

मजुरी दर आठवड्याला दिली जाते किंवा काही प्रकरणात एखादे काम झाल्यानंतर १५ दिवसांपेक्षा अधिक काळ लागणार नाही, याची खात्री करून मजुरी दिली जाते.

## २२. मजुरी कशी मोजली जाते?

ही मजुरी किती वेळ आणि कोणते काम केले त्यावरून ठरते. ९ तास काम, त्यातील एक तास विश्रांतीचा असतो. मजुरीचे मोजमाप त्यानुसार केले जाते.

## २३. मजुरी कशा प्रकारे दिली जाते?

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्यानुसार मिळणारे सर्व वेतन हे बँका किंवा टपाल कार्यालयामार्फत दिले जाते. ते थेट मजुराच्या खात्यात जमा होते. ज्या घरात पुरुष प्रमुख आहे त्या घरातील महिलांसाठी वेगळे खास खातेही उघडले जाते.

## २४. या योजनेसाठीची निरीक्षण यंत्रणा कशी आहे?

**१. मंत्रालय स्तरावरील निगराणी :**

या योजनेची राज्य सरकारकडून प्रत्यक्ष कामांच्या बाबतीत आणि निधीच्या बाबतीत कशा प्रकारे अंमलबजावणी होत आहे हे पाहण्यासाठी केंद्रीय ग्राम विकास मंत्रालय अंतर्गत आणि बाह्य यंत्रणा उभारली जाते. या यंत्रणांकडून कामाचा वेग तपासला जातो. त्यांची कार्यप्रणाली अभ्यासली जाते आणि काही समस्या असल्यास त्या सोडविण्यासाठीही प्रयत्न होतात.

**अंतर्गत निरीक्षण**

**१. व्यवस्थापन माहिती यंत्रणा** (MIS)- वेब आधारित MIS- www.nrega.nic.in ची उभारणी करण्यात आली आहे. सर्वसामान्य प्रक्रियेचा भाग म्हणून ग्रामीण भागातील प्रत्येक घरातील व्यक्तींची माहिती ही योजना सतत कार्यान्वित रहावी तसेच निश्चित रहावी यासाठी तपासली जाते. सार्वजनिक स्तरावर यातील प्रत्येक बाबींची छाननी केली जाते.

अ) कामगार पात्रता विषयक माहिती आणि दस्तऐवज. यात नोंदणी, जॉब कार्ड, हजेरी पत्रकांचा समावेश होतो.

ब) मंजुरी मिळालेली आणि सध्या सुरू असलेली कामे, मोजमापे

क) किती जणांना रोजगार मिळाला ही माहिती

ड) वित्तीय माहिती वेतनासह

**२. मासिक प्रगती अहवाल-** हा प्रत्यक्ष कामावर आणि घडामोडींवर असतो. तो जिल्हा प्रशासनाकडून सादर होतो.

**बाह्य निरीक्षण**

**वैधानिक संस्थात्मक यंत्रणा**

**१. केंद्रीय रोजगार हमी परिषद (सीईजीसी):** या परिषदेची राष्ट्रीय स्तरावर स्थापना करण्यात आली असून तिच्यावर या कायद्याची अंमलबजावणी आणि सुधारणा

करण्याची जबाबदारी आहे. या परिषदेचे सदस्य विविध राज्यांना भेटी देऊन कामाच्या प्रगतीची पाहणी करतात. त्याशिवाय हे सदस्य फेरआढावा, अभ्यास, प्रशिक्षण आणि सामाजिक लेखा परीक्षणातही सहभागी होतात.

**२. महालेखा परीक्षक (सीएजी):** या योजनेचे लेखा परीक्षण कॅग कडूनही केले जाते. त्यासाठी मंत्रालयाकडून कॅगला विनंती केली जाते.

**अन्य यंत्रणा**

**३. केंद्र स्तरीय निरीक्षक आणि विभागीय अधिकारी:** केंद्रीय ग्रामविकास खात्याचे केंद्रीय निरीक्षक, विभागीय अधिकारी आणि अन्य अधिकारी हे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्यातील टप्पा १, २.३ च्या टप्प्यांना वार्षिक भेटी देतात.

**४. राज्यांकडून फेर आढावा:** या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीच्या प्रतिसादाबाबत राज्य सरकारांशी चर्चा करून त्याचे विश्लेषण केले जाते. हा आढावा त्रैमासिक प्रगतीवर आधारित असून तो आढावा समिती आणि राज्यस्तरीय समितीकडून घेतला जातो.

**५. व्यावसायिक संस्थात्मक नेटवर्क आणि अन्य अभ्यास:** या प्रकल्पाचा अभ्यास करण्यासाठी व्यावसायिक संस्थात्मक नेटवर्क (पीआयएन) उभारण्यात आले आहे. त्यातून कार्यक्रमाचा दर्जा आणि अन्य बाबींचा अभ्यास केला जातो. या संस्था हा प्रकल्प योग्य रितीने चालावा यासाठी आवश्यक आढावा, संशोधन, क्षमता उभारणी करतात. त्याचबरोबर या क्षेत्रातील उत्तम पद्धतींचाही अवलंब त्यातून केला जातो. यात प्रामुख्याने जिल्हा स्तरावर क्षमता वाढवून त्याच्या आधारे सकारात्मक परिणाम घडविणे यावर भर दिला जातो.

**६. ख्यातनाम नागरिक:** देशभरात या योजनेचे कामकाज कसे चालले आहे ते पाहण्यासाठी देशातील १०० मान्यवर नागरिकांचा गट स्थापन केला आहे.

**२. राज्य, जिल्हा आणि ग्रामपंचायत स्तर :**

- कामाचे परिनिरीक्षण राज्य स्तरावर २%, जिल्हा स्तरावर १०% तर ब्लॉक स्तरावर १००% होते.
- या योजनेखाली मंजूर झालेल्या कामांवर देखरेख करण्यासाठी दक्षता समितीच्या सदस्यांची निवड केली जाते. ही समिती ज्या परिसरात काम सुरू आहे त्या परिसरातील गावकऱ्यांतून बनविली जाते.
- ग्रामपंचायती अन्य संस्थांकडून अंमलबजावणी झालेल्या कामांची देखरेख, त्यांची हजेरी पत्रके आणि वेतनाच्या पद्धतीवर देखरेख करतात.
- राज्य, जिल्हा आणि ब्लॉक स्तरावर या योजनेच्या सर्व पैलूंची पाहणी होते.
- जिल्हा निहाय अभ्यास हा राज्य रोजगार हमी परिषदेकडून व्हायला हवा तसेच ब्लॉक निहाय अभ्यास हा डीपीसी कडून होणे गरजेचे आहे.

## २५. या योजनेची पारदर्शकता आणि उत्तरदायित्व आणखी कशा प्रकारे तपासता येईल.

**१. लोकपाल-** प्रत्येक जिल्ह्यातील गाऱ्हाणी व तक्रारींची दखल घेण्यासाठी तेथे लोकपालाची नियुक्ती व्हावी. ही केंद्र किंवा राज्य सरकारपासून स्वायत्त संस्था असेल.

**२. सामाजिक लेखा परीक्षण-** या योजनेच्या संदर्भात रोहयो मंत्रालय ग्रामपंचायतीकडून होणाऱ्या सामाजिक लेखापरीक्षणाला फार महत्त्व देते. त्यासाठी राज्यसरकारांना वारंवार निर्देश दिले जातात. सामाजिक लेखा परीक्षणाला चालना मिळावी यासाठी या कायद्यात सुधारणाही केली आहे.

**३. हेल्पलाईन-** या योजनेसाठी खात्याने मोफत हेल्पलाइन तयार केली आहे. १८००-११-०७०७ या हेल्पलाइनवर मजुरांच्या तक्रारी, त्यांचे प्रश्न तसेच त्यांच्या हक्कांसदर्भात माहिती दिली जाते. या सर्व तक्रारी राज्य सरकारांकडे कार्यवाहीसाठी जातात. केंद्राच्या हेल्पलाइन व्यतिरिक्त राज्य आणि जिल्हा स्तरांवरही अशा हेल्पलाइन तयार केल्या जात आहेत.

**४. माहितीचा खुलेपणा-** या योजनेच्या अंमलबजावणी बाबतची माहिती www.nrega.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. त्याशिवाय ग्रामविकास खात्याने निर्देश देऊन कार्यस्थळी माहिती फलक लावावेत तसेच ग्रामपंचायत स्तरावरही ही माहिती उपलब्ध करावी असे जाहीर केले आहे.

